RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!

मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-71 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Saturday 19 July 2025 ▪ PAGES 6 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक ७१ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ शनिवार, दि. १९ जुलै २०२५ ▪ पाने ६ ▪ ₹ ४ रुपये

**आजचा शुभ विचार**

स्वप्ने पाहणाऱ्यांना अडथळे आव्हानांचे संकेत म्हणून दिसतात, निराशेचे नाही. स्वप्नांच्या पीछ्याने जाताना, तुमच्या मनाची शक्ती वाढते.




## "कुणाचा बाप आला... बापाचा बाप आला... तरी मुंबई..." मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा विरोधकांना झणझणीत इशारा

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------



विरोधकांकडून सातत्याने मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचा भाजपचा डाव असल्याचा मुद्दा मांडला जातो. याच मुद्द्यावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत खडसावून सांगितले की, मुंबई महाराष्ट्राचीच आहे. कुणाचा बाप आला, बापाचा बाप आला, त्याचा आजोबा आला तरी मुंबई महाराष्ट्राचीच राहील", अशी ठाम भूमिका मुख्यमंत्री फडणवीसांनी सांगितले.

अंतिम आठवडा प्रस्तावाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत उत्तर दिले. मुंबईच्या विकासाबद्दल त्यांनी राज्य सरकारची भूमिका मांडली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, " प्रत्येकवेळी वर्ष-दीड वर्षांनी आलेल्यांना मुंबई बदलेली पाहायला मिळतंय. अण्णाभाऊ साठेंनी जी व्यथा मुंबईत अनुभवली, ती व्यथा कुणाच्या वाट्याला येऊ नये असा प्रयत्न आपण करतो. म्हणून अण्णाभाऊ साठेंची एक कविता आहे, मुंबईवर. त्यांनी काय अनुभवलं', असे म्हणत देवेंद्र फडणवीस ती कविता वाचून दाखवली.

"याच कवितेमध्ये संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीची नांदी केलेली आहे. ही कविता वाचण्याचं कारण एवढंच आहे की, ४ महिन्यांनंतर भाषणं सुरू होतील महाराष्ट्रापासून मुंबईला तोडण्याचं षडयंत्र सुरू झालेलं आहे", असा टोला फडणवीसांनी विरोधकांना लगावला.

फडणवीस पुढे म्हणाले की, "आताच सांगतो. मुंबईला महाराष्ट्रापासून कोणीही तोडू शकत नाही. कुणाचा बाप... बापाचा बाप... त्याचा बाप... त्याचा बाप... त्याचा आजोबा आला तरीही मुंबई महाराष्ट्राचीच आहे. मुंबई महाराष्ट्राचीच राहील आणि हजारो पिढ्या राहील. या महाराष्ट्रात आणि मुंबईमध्ये मराठी माणसाचा आवाज बुलंद राहील", असे फडणवीस विधानसभेत बोलताना म्हणाले.

फडणवीस पुढे म्हणाले की, "आताच सांगतो. मुंबईला महाराष्ट्रापासून कोणीही तोडू शकत नाही. कुणाचा बाप... बापाचा बाप... त्याचा बाप... त्याचा बाप... त्याचा आजोबा आला तरीही मुंबई महाराष्ट्राचीच आहे. मुंबई महाराष्ट्राचीच राहील आणि हजारो पिढ्या राहील. या महाराष्ट्रात आणि मुंबईमध्ये मराठी माणसाचा आवाज बुलंद राहील", असे फडणवीस विधानसभेत बोलताना म्हणाले.

## "गणपती बाप्पा... सरकार मोरया!" महाराष्ट्र शासन थेट गणेशोत्सवात उतरणार, मंत्री आशिष शेलारांनी घोषणा

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------





शंभर वर्षाहून मोठी परंपरा असलेला महाराष्ट्रातील गणेशोत्सवाला राज्य माहेत्सवाचा दर्जा देण्यात आला असून महाराष्ट्रातील गणेशोत्सवात यावर्षी पासून शासन थेट सहभागी होऊन हा महोत्स्व राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहचवण्यासाठी तसेच राज्यात गणेशोत्सवात होणाऱ्या विविध कार्यक्रमांची रुपरेषा आज सांस्कृतीक कार्य मंत्री ॲड आशिष शेलार यांनी विधानसभेत जाहीर केली.

विधानसभेत सांस्कृतीक कार्यमंत्री ॲड आशिष शेलार यांनी जाहीर केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्र ही कला, संस्कृती व परंपरेची समृद्द भूमी आहे. संत-सुधारकांचा, थोरांचा-विरांचा,भक्तीचा-अध्यात्माचा आणि सर्वसमावेशकतेचा वारसा या भूमीला लाभलेला आहे

दख्खनची ही पवित्र माती वैचारिक प्रकल्पभतेने ओतप्रेत भारलेली असून, राज्याच्या आर्थिक/ सामाजिक, सांस्कृतिक प्रगतीचा पाया सामाजिक एकरुपतेने घातलेला आहे. ही एकरूपता निर्माण होण्यासाठी गणेशोत्सवाने मोलाची भूमिका पार पडलेली आहे. शेकडो वर्षाची घरगुती गणेशोत्सव परंपरा व अनेक वर्षापासूनची सार्वजनिक गणेशोत्सव परंपरा म्हणजे महाराष्ट्राच्या संस्कृतिक व सामाजिक समरसतेचे मानबिंदूच आहेत. याच मानबिंदूच महत्त्व व ओळख संपूर्ण जगभर व्हावी, आपल्या परंपरेची आधुनिकतेशी सांगड व्हावी सामाजिक व सांस्कृतिक दृष्ट्या महत्वाचे असणारे गणेशोत्सव हे व्यासपीठ आणखी मजबूत व्हावे, गणेशोत्सवासंबंधी सर्व घटक एकत्र जोडले जावेत, पर्यटन वाढावे, आपल्या समृद्ध परंपरा रितीरिवाजांचे जतन-संवर्धन व्हावे आणि महाराष्ट्राचे स्थान जगाच्या नकाशावर आधारित व्हावे यासाठी गणेशोत्सव हा राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्याचे महाराष्ट्र शासनाने ठरवले आहे. गणेशोत्सवाचे परंपरागत स्वरूप कायम ठेवून त्यास आधुनिकतेची जोड देण्यासाठी आणि राज्याचा प्रत्येक नागरिक प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या या महोत्सवाशी जोडला जाण्यासाठी राज्य महोत्सव होणे आवश्यक आहे. यासाठी महाराष्ट्र शासन सुलभकर्ता म्हणून महत्त्वाची भूमिका बजावेल.

- राज्य महोत्सवाच्या एका लोगोचे अनावरण करण्यात येणार
- संपुर्ण राज्यभर सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येईल. महाराष्ट्राची कला व संस्कती आणि परंपरेचे दर्शन या कार्यक्रमांतून घडेल. हे कार्यक्रम फक्त महाराष्ट्रातच नाहीतर महाराष्ट्राबाहेर ज्या ठिकाणी मराठी बांधव मोठया प्रमाणात आहेत त्या ठिकाणीही करण्यात येईल.. तसेच मराठी भाषिक बहुल भारताबाहेरील काही देशामध्ये सांस्कृतिक कार्यक्रांचे आयोजन करण्यात येईल.
- व्याख्यानमालेचे आयोजन
- गणेशोत्सवाच्या निमित्ताने अध्यात्म नाट्यरंग महोत्सवाचेही आयोजन
- राज्यातील महत्वाची मंदीरे आणि सर्वजनिक गणेशोत्सवाचे देखावे यांचे ऑनलाइन दर्शन घरबसल्या यावे यासाठी एक पोर्टल निर्माण करण्यात येईल.
- उत्कृष्ट सार्वजनिक गणेश मंडळ अंतर्गत तालुका स्तरावर स्पधेद्वारे विविध पारितोषिके देण्यात येतील.
- घरगुती गणेशोत्सव आणि सार्वजनिक गणेशोत्सवाचे फोटो व्हिडिओ क्लिप्स पोर्टलवर येण्यासाठी एक प्लॅटफॉर्म विकसित करण्यात येईल.
- ज्या चित्रपटांमधून गणपती विषयक परंपरा, कला संकृती दर्शिविलेली आहे अशा चित्रपटांचा विशेष गौरव करण्यात येईल.
- गणेशोत्सवावर आधारित टपाल तिकीट आणि नाणे काढण्यात येईल.
- संपूर्ण राज्याभरातून गणपतीविषयक रिल्स स्पर्धा आयोजित करण्यात येईल.
- एका ड्रोनशोचे आयोजन करणार.
- या राज्य महोत्सवाची माहिती संपूर्ण देशाभर व्हावी यासाठी वृत्तपत्रे वृत्तवाहिन्या रेडिओ आणि समाज माध्यमे यांच्या माध्यमातून देशभरात प्रचार प्रसिद्धी करणार.
- आंतरराष्ट्रीय व आंतरराज्यीय पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी विशेष कार्यक्रम उपक्रम हाती घेणार.
- उत्सवाच्या दरम्यान प्रमुख ठिकाणी विद्युत रोषणाई व सुशोभिकरण करणार.
- पारंपारिक भजन व आरती सादर करणाऱ्या भजनी मंडळांना साहित्य वाटप अनुदान देणार.
- राज्यस्तरीय भजन स्पर्धेचे आयोजन.
- विर्सजन सोहळयामध्ये आंतरराज्यीय व आंतरराष्ट्रीय पर्यटकांसाठी विविध सोयी सुविधा व वाहन व्यवस्था उपलब्ध करणार.
- राज्यातशिकत असणाऱ्या देशाबाहेरील विद्यार्थ्यांना या महोत्सवात सहभागी होण्यासाठी योजना, उपक्रम राबविणार.

असे मंत्री आशिष शेलार यांनी जाहीर केले आहे.

**महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक स्वराज्यदूत वृत्तपत्रातर्फे राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन !**

स्वराज्यदूत गौरव पुरस्कार



कर्तृत्वाचा सन्मान... स्वराज्याचा मान !!

महाराष्ट्रातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषी, सहकार, उद्योग, वैद्यकीय, पत्रकारिता (वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक / डिजीटल मीडिया), युवक, महिला, कला, साहित्य, क्रीडा, पर्यावरण, ग्रामविकास अशा विविध क्षेत्रांमध्ये

कौतुक तुमच्या कार्याचे

उल्लेखनिय कार्य करणाऱ्या संस्था व मान्यवर व्यक्तींच्या कार्याचा विशेष सन्मान करून भावी वाटचालीस तसेच उल्लेखनिय कार्य करण्यासाठी प्रेरणा मिळावी म्हणून दैनिक स्वराज्यदूतने हा पुरस्कार आयोजित केलेला आहे.

दैनिक स्वराज्यदूत SWARAJYADOOT
SWARAJYADOOT LIVE
दैनिक वृत्तपत्र वृत्त वाहिनी

ऑगस्ट महिन्यात नाशिक येथे अतिशय भव्य-दिव्य समारंभात पुरस्कार वितरण नियोजित

**प्रस्ताव पाठविण्यासंदर्भात सूचना**

- संपूर्ण प्रस्ताव pdf स्वरुपात संगणकावर तयार केलेल्या स्वरुपात दि. ३१ जुलै २०२५ पर्यंत फक्त Google Form द्वारेच पाठवायचा आहे. गुगल फॉर्म लिंक 8446673677 या व्हॉटसअप वर उपलब्ध केली आहे. उपलब्ध झाली नसेल तर तशी मागणी करू शकतात.
- फक्त निवड झालेल्या व्यक्तींना प्रस्तावाची प्रिंट स्वरुपात (Hard copy) जमा करावी लागेल.
- प्रस्ताव पूर्णपणे मोफत स्वीकारले जातील. कोणताही आर्थिक मोबदला देण्याचा प्रयत्न करू नये. पुरस्कारासाठी कुणाशीही आर्थिक व्यवहार करू नये.
- दैनिक स्वराज्यदूत परिवाराशी संबंधित व्यक्ती, प्रतिनिधी यांना प्रस्ताव पाठवता येणार नाहीत.
- जिल्हा परिषद कर्मचारी, राज्य व केंद्र सरकारचे कर्मचारी यांचे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाही.

अधिक माहितीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.
8446673677 / 8010232449

## बनावट कागदपत्रे बनवून भोपाळमध्ये किन्नर बनून रहाणा-या बांगलादेशी अब्दुलचे महाराष्ट्र कनेक्शन!

विशेष वृत्तसेवा
दैनिक स्वराज्यदूत

------------------------



मध्य प्रदेशची राजधानी भोपाळमध्ये पोलिसांनी स्वतःला किन्नर (तृतीयपंथी) दाखवून दीर्घकाळापासून राहत असलेल्या एका बांगलादेशी नागरिकाला अटक केली आहे. आरोपीचे खरे नाव अब्दुल कलाम असून, तो नेहा किन्नर या नावाने अनेक वर्षांपासून शहरात वास्तव्यास होता.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अब्दुल वयाच्या १७ व्या वर्षी भारतात आला होता आणि येथे राहून त्याने बनावट भारतीय कागदपत्रे बनवून आपली खरी ओळख लपवून ठेवली होती. त्याने अनेक भारतीय कागदपत्रे मिळवली होती.

मिळालेल्या माहितीनुसार, नेहा किन्नर उर्फ अब्दुल कलाम आधी महाराष्ट्रात राहिला आणि त्यानंतर भोपाळमधील मंगलवारा आणि बुधवारा भागात तो वास्तव्य करू लागला. त्याने भारतीय नागरिकत्व सिद्ध करण्यासाठी आधार कार्ड, मतदार कार्ड यांसारखी महत्त्वाची कागदपत्रे बनवून घेतली होती आणि समाजात स्वतःला पूर्णपणे किन्नर असल्याचे भासवत होता.

पोलिसांच्या गुप्तचर पथकाला माहिती मिळाली होती की, नेहा हा बांगलादेशी नागरिक असून, वैध कागदपत्रांविना भारतात राहत आहे. या माहितीनंतर तलैया पोलिसांनी कारवाई करत जवळपास आठवडाभरापूर्वी त्याला ताब्यात घेतले.

पोलीस सूत्रांचे म्हणणे आहे की, नेहाची गुन्हेगारी पार्श्वभूमीही समोर आली आहे. २०१९ मध्ये त्याच्यावर एमपी नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. सध्या या प्रकरणाचा तपास सुरू असून, आरोपीची कसून चौकशी केली जात आहे.

भोपाळ पोलीस आयुक्तांनी सांगितले की, शहरात बेकायदेशीरपणे राहत असलेल्या परदेशी नागरिकांची ओळख पटवण्याचे अभियान सुरू आहे. आतापर्यंत नेहा किन्नर उर्फ अब्दुल कलामबाबत हद्दपारीचे आदेश जारी करण्यात आलेले नाहीत. परंतु चौकशी पूर्ण झाल्यानंतर त्याला बांगलादेशला पाठवण्याची तयारी केली जात आहे.

पोलिसांनी लोकांना आवाहन केले आहे की, कोणत्याही संशयित व्यक्तीची माहिती तत्काळ पोलिसांना द्यावी, जेणेकरून शहरात अवैध हालचाली आणि बनावट कागदपत्रांवर आळा घालता येईल.

दरम्यान, या प्रकरणामुळे बांगलादेशी नागरिकांच्या बनावट भारतीय कागदपत्रे बनवून देण्यावरून पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

संपादकीय

# कर्ज: भारत आणि अमेरिका मानसिकतेतील विरोधाभास

कर्ज घ्यायचे म्हटले की, आपली जुनी पिढी दहा वेळा विचार करेल. कर्ज घेण्याची खरोखरीच आवश्यकता आहे का? मी माझ्या बचतीतून खर्च करू शकतो का? माझ्याकडचे दागिने विकून पैसे उभे करू शकतो का? अशा अनेक शक्यता तपासून बघतो आणि मग काय तो निर्णय घेतो. या पार्श्वभूमीवर जगातील सर्वात बलाढ्य अर्थव्यवस्था असलेल्या अमेरिकेतील ग्राहकांची मानसिकता काय आहे याचा धांडोळा मल्होत्रा नावाच्या एका गृहस्थांनी घेतला आणि त्याची तुलना भारतीय मानसिकतेशी केली आहे.

कोणत्याही कारणासाठी कर्ज घेणे किंवा क्रेडिट कार्ड वापरणे हे अमेरिकन ग्राहकांच्या हाडामासात खिळलेले आहे. ८२ टक्क्यांहून अधिक प्रौढ अमेरिकनांकडे किमान एक तरी क्रेडिट कार्ड आहे. तिथेही 'क्रेडिट स्कोअर' अर्थात आपले पतमानांकन ही संकल्पना आहे. अर्थातच याचा प्रभाव गृहकर्जावरील व्याज दरापासून नोकरीच्या अर्जापर्यंत सगळीकडे पडतो. पत मानांकन चांगले असेल तर स्वस्त व्याज दरात कर्ज मिळू शकते आणि अगदी नोकरी मिळण्यासाठीही त्याचा उपयोग होऊ शकतो. मार्च २०२४ मधील आकडेवारीनुसार अमेरिकनांनी क्रेडिट कार्डद्वारे वापरलेली एकूण रक्कम १.३४ ट्रिलीयन अमेरिकन डॉलर्स इतकी अवाढव्य आहे. (गरजूंनी याचे भारतीय रुपयात रूपांतर करावे) आपल्याकडे काय परिस्थिती आहे? कर्ज घेणे किंवा उधारी हे पारंपरिक दृष्टिकोनातून योग्य नसले, तरी आकडेवारी सांगते की, आपला देश याबाबतीत एका क्रांतीच्या उंबरठ्यावर आहे.

सध्या एकूण लोकसंख्येच्या जेमतेम ५.५% (साडेसात कोटींहून अधिक) लोकांकडे क्रेडिट कार्ड्स असली, तरी आधुनिक विचारांच्या नव्या पिढीमुळे क्रेडिट कार्ड्स घेऊन शक्य असेल तिथे त्यांचा वापर करणे यात झपाट्याने वाढ होत आहे. गेल्या पंधरा वर्षांत कर्ज घेणाऱ्यांचे प्रमाण १२ टक्क्यांवरून २० टक्क्यांवर गेले आहे. अमेरिकेच्या तुलनेत खूप कमी असली तरी भारतीय क्रेडिट कार्डधारकांनी वापरलेली रक्कम रु. २ लाख कोटींच्या वर आहे. या मानसिकतेतील फरकही लक्षात घ्यायला हवा. अमेरिकतील ही मानसिकता परिपक्व आणि पूर्णपणे व्यावसायिक, तर आपली मानसिकता नवी, परंतु उत्साही.

अमेरिकेतील क्रेडिट कार्ड संस्कृतीचा उदय हा तेथील अर्थकारण जेव्हा ग्राहककेंद्री बनू लागले तेव्हाचा, म्हणजे साधारणत: १९५० च्या दशकातला. दुसरे महायुद्ध संपले होते आणि शहरांच्या जोडीने उपनगरांचाही विकास होऊ लागला होता. युद्धामुळे आलेली मंदी कमी होऊन हळूहळू सुबत्ता येऊ लागली. लोकांची प्राप्ती वाढू लागली.

ग्राहकोपयोगी वस्तूंच्या किमती आवाक्यात येऊन त्यांची खरेदीही वाढू लागली. ही अचूक वेळ साधून डायनर्स क्लब या जगप्रसिद्ध कंपनीने सामान्य लोकांना सर्वसाधारण वापरासाठी उपयोगी पडावे असे एक कार्ड बाजारात आणले. हे कार्ड वापरल्यावर येणारे बील सुलभ हप्त्यात भरायची, तसेच शिल्लक असलेली मर्यादा परत परत वापरायची सोय अमेरिकन लोकांना चांगलीच भावली. १९७० ते १९८० या दशकात तेथील बँकाही या व्यवसायात उतरल्या आणि जन्माला आली ती ग्राहकांचे पतमानांकन करणारी व्यवस्था. त्यामुळे कोणाला क्रेडिट कार्ड किंवा कर्ज द्यावे, त्यात जोखीम किती, याचा आढावा घेणे बँकांना शक्य होऊ लागले.

अर्थात हा सगळा प्रवास सुरळीतपणे पार पडला असे म्हणता येणार नाही. २००८ साली आलेल्या भीषण मंदीने अनेकजण होरपळून निघाले. पण त्यातूनही उभारी घेऊन सर्वसाधारण अमेरिकन माणसाने क्रेडिट कार्ड संस्कृती जपली आहे. कर्ज घेणे हे आर्थिक समृद्धीसाठी आवश्यक आहे असे तिथे मानले जाते. भारतातील परिस्थिती आता फारशी वेगळी नाही. आपल्या येथील प्रवास सावधगिरीकडून उपभोगाकडे होऊ लागला आहे. एके काळी कर्ज घेणे निषिद्ध मानले जात होते. बचतीकडे कल होता. कर्ज घ्यावे लागलेच तर ते उच्चशिक्षण किंवा घर खरेदी यापुरतेच मर्यादित होते.

साधारणत: सरकारी बँका किंवा बिगर बँकिंग कंपन्या लोकांच्या या गरजेची पूर्तता करायच्या. हौसेमौजेसाठी किंवा इतर काही कारणासाठी कर्ज घेणे ही संकल्पना १९९० साली जागतिकीकरणाचे दरवाजे खुले झाल्यावर रुजू लागली. खासगी बँका अस्तित्वात आल्या. ऑनलाईन व्यवहार वाढू लागले. खरेदी-विक्रीसाठी ई-कॉमर्सचा उदय झाला. काय हवे ते खरेदी करा आणि हप्त्याहप्त्याने त्या किमतीची परतफेड करा किंवा आता क्रेडिट कार्डाने खरेदी करा आणि महिनाभराने बील आल्यावर ते चुकते करा, अशा संकल्पनांचे अक्षरश: पेव फुटले. त्यातूनच पुढे हळूहळू कार खरेदी, वैयक्तिक कारण, महागडी घड्याळे, महागडे मोबाइल्स यासाठी कर्ज घेणे किंवा क्रेडिट कार्डचा वाढता वापर होऊ लागला.

कर्ज देणाऱ्या काही कंपन्यांनी तर छोट्या छोट्या खरेदीसाठी 'शून्य व्याज ईएमआय'ची सुविधा उपलब्ध करून दिली. जोडीला व्यवसायाच्या नवनवीन संधी उपलब्ध झाल्या. तरुणपणीच हातात चांगला पैसा खेळू लागला. याचा परिणाम असा झाला की, केवळ पाच वर्षांपूर्वी असलेली क्रेडिट कार्डधारकांची साडेपाच कोटींची संख्या दुपटीने वाढली. हे सगळे काही दिसायला छान छान असले, तरी त्यातील अंगभूत धोके जाणून सावधगिरी बाळगायला हवी. कर्जे बुडीत जाण्याचे अमेरिकेतील प्रमाण वाढत आहे. आपल्या देशातही विशेषत: ग्रामीण किंवा निमशहरी भागात कर्जाच्या सापळ्यात फसणाऱ्या लोकांचे प्रमाण वाढू लागले आहेत.

एक कर्ज फेडण्यासाठी एक कार्ड वापरले, त्याच्यावरील कर्ज फेडण्यासाठी दुसरे कार्ड वापरले, असे गंभीर प्रकार चालू झाले आहेत. गुंतवणुकीतून दामदुप्पट पैसे मिळण्याच्या आमिषानेही कर्ज घेऊन अशी गुंतवणूक केली जात आहेत. एकतर ही कर्जे तारणविरहित, म्हणजेच असुरक्षित आणि त्यातून ही कर्जे वसूल होत नसल्याने बँकांचीही डोकेदुखी वाढू लागली आहे. मध्यंतरी रिझर्व्ह बँकेने केलेल्या पाहणीनुसार काही गोष्टी चिंताजनक बनू लागल्या आहेत.

चक्क सोन्याच्या तारणावरील कर्जांचे थकबाकीचे प्रमाण वाढू लागले आहे. जोडीला तारणविरहित कर्जांचे प्रमाणही वाढू लागले आहे. सध्या अमेरिकेच्या तुलनेत आपली आकडेवारी फारशी वाईट दिसत नसली, तरी आपल्या एकूण लोकसंख्येचा विचार करता परिस्थिती स्फोटक बनू शकते. ते होऊ नये म्हणून गरज आहे ती योग्य शिक्षणाची आणि लोकांना जागृत करण्याची.

# जव्हार (राजेवाडी) येथे गॅस्ट्रोची साथ; दोन जणांचा मृत्यू, १४ जणांवर उपचार सुरू!

## विहिरीतील दूषित पाणी कारणीभूत; गावात भीतीचं वातावरण

संतोष मोहिते
विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------------

जव्हार तालुक्यातील नांदगाव ग्रामपंचायत हद्दीतील राजेवाडी या पाड्यात गॅस्ट्रोच्या साथीने थैमान घातले आहे. या साथीमुळे चिंटू गोंडा (वय ५५) व अनिता गांगड (वय ४५) या दोन व्यक्तींचा मृत्यू झाला असून, सध्या १४ रुग्णांवर जव्हार येथील कुटीर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. रुग्णांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली आहे.

राजेवाडीत पावसामुळे विहिरीत झिरपणारे दूषित नाल्याचे पाणी हे साथीचे मुख्य कारण मानले जात आहे. गावात जलजीवन योजनेचे काम अद्याप अपूर्ण



असल्यामुळे नागरिकांना पिण्यासाठी विहिरीच्या पाण्यावरच अवलंबून राहावे लागत आहे. यामुळे साथीचा धोका अधिकच वाढला आहे.

दोन दिवसांपूर्वी काही नागरिकांना उलट्या व जुलाबाचा त्रास सुरू झाला. लवकरच रुग्णांची संख्या वाढू लागली. काहींना नांदगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात तर काहींना जव्हारच्या कुटीर रुग्णालयात दाखल करण्यात आले. मृतांपैकी एका रुग्णाचा मृत्यू रुग्णालयात झाला, तर दुसऱ्याचा मृत्यू राहत्या घरीच झाला.

या घटनेची माहिती मिळताच आरोग्य विभागाने तत्काळ हालचाली सुरू केल्या असून गावात तपासणी मोहिमा, औषधफवारणी, व स्वच्छतेचे उपाय केले जात आहेत. साथीला आटोक्यात आणण्यासाठी प्रशासन सतर्क आहे.

जव्हार-मोखाडा परिसरातील अनेक दुर्गम पाडे आजही सुरक्षित व स्वच्छ पिण्याच्या पाण्यापासून वंचित आहेत. अशा भागात पावसाळ्यात गरोदर माता व बालकांसाठी आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण होतो. शासनाच्या योजनांची अंमलबजावणी होत नाही तोपर्यंत अशा घटना पुन्हा पुन्हा घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# भटक्या कुत्र्यांच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय योग्यच

भटक्या कुत्र्यांचा भयावह घटना पहाता याचिकाकर्त्याला सर्वोच्च न्यायालयाने सुनावलेले उत्तर स्वागतार्ह आहे. मानवाच्या रक्षणार्थ भटक्या कुत्र्यांना रस्त्यावर खाऊ घालने अयोग्यच आहे.ज्यांना भटक्या कुत्र्यांची दया येत असेल त्यांनी आपल्या घरात खाऊ घालावे याचे स्वागत सर्वच स्तरातून केल्या जाईल.दया हे मानवीयदृष्टया महान कार्य आहे.परंतु यापोटी भटक्या श्वानांना खाऊ घालण्यावरून एखाद्याचा स्थानिक लोक छळ करीत असतील तर? नेमक्या अशा एका प्रकरणात छळापोटी सर्वोच्च न्यायालयात दाद मागणाऱ्या याचिकाकर्त्याला सर्वोच्च न्यायालयाने चांगलेच फटकारले व म्हणाले "अशा श्वानांना रस्त्यावर खाऊ घालण्यापेक्षा तुम्ही तुमच्या घरी का खाऊ घालत नाहीत? " असा सवाल न्यायालयाने केला.नोएडातील एका याचिका कर्त्याच्या सुनावणीमध्ये लावारीस कुत्र्यांच्या बाबतीत याचिकाकर्त्याच्या वकिलाने म्हटले की प्राण्यांना खाऊ घालण्याच्या कामी आमच्या याचिकाकर्त्याला त्रास होत आहे आम्ही पशु नियंत्रण नियमांतर्गत काम करीत असुनही आम्हाला का त्रास दिला जात आहे? यावर न्यायालयाने म्हटले की, आम्ही किती रस्ते आणि गल्ल्या पशुप्रेमीसाठी सोडायच्या? प्रत्येक ठिकाणी प्राण्यांसाठी जागा आहे.माणसांसाठी नाही.तुमच्या सारख्या ज्या लोकांना प्राण्यांचा पुळका असेल त्यांनी आपल्या घरात प्राण्यांसाठी निवासगृह सुरू करावे.सर्वच भटक्या कुत्र्यांना तुम्ही तीथेच खाऊ घाला.तुम्हाला हे करण्यापासून कोणी थांबवणार नाही.देशात भटक्या कुत्र्यांच्या अनेक हुदयात व अंगावर शहारे येणाऱ्या घटना आपण सोशल मीडियाच्या माध्यमातून व वर्तमानपत्रातुन पाहिल्या किंवा ऐकल्या आहेत.अशा परिस्थितीत भटक्या कुत्र्यांवर लगाम कसने काळाची गरज आहे.परंतु काही प्राणी प्रेमी रस्त्यावरील कुत्र्यांना खाऊ घालतात व याचा विपरीत परिणाम सर्वसामान्याना भोगावा लागतो.कारण कुत्र्यांना त्यांच्या वेळेवर खायला भेटले तर ठीक आहे;जर त्यांना वेळेवर जर खायला मिळाले नाही तर ते उग्र रूप धारण करतात.अशा परिस्थितीत पायदळ चालणारे, दुचाकी वाहन चालविणारे, शाळकरी मुले, सायकलस्वार अशांवर आक्रमन करतात व चावा घेण्याचा प्रयत्न करतात आपण चावा घेण्याच्या भयावह घटना वर्तमानपत्राच्या माध्यमातून किंवा मिडियाच्या माध्यमातून पाहिल्या आहेत.त्यामुळे प्राण्यांची सेवा करने वाईट नाही. प्राण्यांची सेवा केलीच पाहिजे परंतु त्यापासून कोणालाही नुकसान होणार नाही याचीही काळजी घेतली पाहिजे.कारण ते मुके प्राणी आहेत.परंतु त्यांच्यापासून कोणालाही इजा किंवा त्रास होणार नाही हे सुद्धा तितकेच महत्त्वाचे आहे. देशात तब्बल ६ करोड २० लाख भटक्या कुत्र्यांची संख्या आहे. त्यात महाराष्ट्राचा विचार केला तर १२ लाख ७६ हजार भटक्या कुत्र्यांची संख्या आहे.भारतात दरवर्षी कुत्रा चावल्याने २० हजार लोकांचा मृत्यू होतो असे एका अभ्यासात म्हटले आहे.भारतात सध्याच्या परिस्थितीत साप चालण्यापेक्षा कुत्र्याच्या चावण्याने जास्त लोक मरतात. रेबीजमुळे होणारे ३६ टक्के मृत्यू भारतात होतात.यावरून आपण समजू शकतो की कुत्र्यांचा चावा किती भयानक असतो व याचे दुष्परिणाम सर्वांच्याच समोर आहे.प्रशासन कुत्र्यांची नसबंदी कितपत करतात आणि किती सक्सेस होते यावरही प्रश्न चिन्ह उपस्थित होतो.आजही बऱ्याचशा राज्यात भटक्या कुत्र्यांची भयंकर दहशत आहे या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय योग्य आणि जनहितार्थ असल्याचे मी समजतो.त्याचबरोबर रस्त्यावर अनेक पशु रोडवर किंवा रोडच्या कडेला बसून असतात कधीकधी दुर्घटनाग्रस्त सुध्दा होतात यावरही सरकारने व स्थानिक प्रशासनाने योग्य ती उपाययोजना करायला पाहिजेत.परंतु रस्त्यावरील कुत्र्यांच्या बाबतीत ज्यांना भावनिक किंवा जास्त काळजी वाटत असेल त्यांनी अशा भटक्या कुत्र्यांची व्यवस्था स्वतः करावी जेणेकरून त्यांचा त्रास सर्वसामान्य नागरिकांना होणार नाही.मुक्या जनावरांची सेवा करणे हा मानव धर्म आहे परंतु याचे विपरीत परिणाम व सर्वसामान्यांना त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी. देशातील संपूर्ण राज्य सरकारांना विनंती आहे की भटक्या कुत्र्यांच्या भयावह घटना पहाता स्थानिक प्रशासनाच्या वतीने यावर योग्य उपाययोजना करावी.

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार )
नागपूर.

# न्यू इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय साक्रीने २०२५-२६ चा जिल्हास्तरीय सुब्रोतो मुखर्जी फुटबॉल कप पटकावला

प्रविण काकुस्ते
पिंपळनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------------



न्यू इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय साक्रीने २०२५-२६ चा जिल्हास्तरीय सुब्रोतो मुखर्जी फुटबॉल एस.एस.व्ही.पी.एस. कॉलेज, धुळे यांच्या मैदानावर १० व ११ जुलै रोजी पार पडलेल्या जिल्हास्तरीय सुब्रोतो मुखर्जी अंडर-१७ फुटबॉल स्पर्धेत न्यू इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, साक्री या शाळेने ऐतिहासिक यश मिळवले. अंतिम सामन्यात त्यांनी हस्ती पब्लिक स्कूल, दोंडाईचा या बलाढ्य संघाला पेनल्टी शूटआउट मध्ये पराभूत करून २०२५-२६ चा जिल्हास्तरीय सुब्रोतो मुखर्जी कप आपल्या नावे केला.

या भव्य विजयामुळे न्यू इंग्लिश स्कूलचा संघ विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी पात्र ठरला असून, संस्थेच्या शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रातील योगदानाची पुन्हा एकदा ठळक नोंद झाली आहे.

संघाचा गौरव करणारे मान्यवर:
विजयी संघातील खेळाडूंना आणि क्रीडा शिक्षकांना संस्थेचे अध्यक्ष मा. दादासो परागजी बेडसे, सेक्रेटरी मा. भैय्यासो अनिलजी सोनवणे, विश्वस्त मा. ॲड. भैय्यासो गजेंद्रजी भोसले, मा. भाऊसाहेब दीपकजी अहिरराव, मा. आबासो संजूजी पाटील, मा. अण्णासो यू. एल. बोरसे, व्यवस्थापन मंडळ सदस्य माईसो. उज्वला बेडसे, तात्यासो. लालाजी मोरे, ताईसो. सुनीता नाईक, प्राचार्य दादासो प्रमोद बेडसे, उपप्राचार्य ताईसो. प्रतिभा शिवदे, उपमुख्याध्यापक अण्णासो विलास गोसावी, पर्यवेक्षक दादासो अविनाश सोनार, दादासो बन्सीलाल बागुल, भाऊसो सतिष सोनवणे आदींनी विशेष अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

मार्गदर्शक शिक्षकांचे मोलाचे योगदान:
या संघाला प्रशिक्षक क्रीडा शिक्षक महेंद्र साबळे, नरेंद्र सोनवणे, प्रसाद भाडणेकर, प्रा. अभिजित सोनावणे, पंकज पाटील, रणजित ठाकरे, तसेच क्रीडा संकुल येथील मार्गदर्शक अनिल पाटील, धनंजय सोनवणे, मनीष जाधव, प्रणव बाविस्कर, तेजस देसले यांचे उत्कृष्ट मार्गदर्शन लाभले.

हा विजय म्हणजे केवळ एका स्पर्धेतील यश नसून, विद्यार्थ्यांच्या मेहनतीला आणि शिक्षक-प्रशिक्षकांच्या समर्पित प्रयत्नांना मिळालेली योग्य फलश्रुती आहे.

# 'पंतप्रधान धन-धान्य कृषी योजने'साठी २४ हजार कोटी रुपयांची तरतूद

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळाने आज बुधवारी तीन मोठ्या निर्णयांना मंजुरी दिली आहे. कृषी अर्थव्यवस्था आणि अक्षय ऊर्जेच्या क्षेत्रात देशाला बळकटी देण्यासाठी केंद्रीय मंत्रिमंडळाने ही पावले उचलली आहेत. यामध्ये प्रधानमंत्री धन-धन कृषी योजना (P M D D K Y ), NTPC NLC इंडिया लिमिटेड (NLCIL) यांचा समावेश आहे.

प्रधानमंत्री धन- धान्य कृषी योजनेचे उद्दिष्ट शेतकऱ्यांच्या जीवनात बदल घडवून आणणे आहे. या अंतर्गत कृषी जिल्ह्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सरकार ३६ केंद्रीय योजनांच्या समन्वयातून दरवर्षी २४, ००० कोटी रुपये खर्च करेल. २०२५-२६ पासून सहा वर्षांसाठी "प्रधानमंत्री धन-धन्य कृषी योजना" ला मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. त्याचे लक्ष्य १०० कृषी जिल्हे विकसित करण्याचे आहे. ही योजना नीती आयोगाच्या 'आकांक्षी जिल्हे' कार्यक्रमापासून प्रेरित आहे.

या योजनेचे उद्दिष्ट कृषी उत्पादकता वाढवणे, पीक विविधीकरणाला प्रोत्साहन देणे, शाश्वत कृषी पर्यायांचा अवलंब करणे, पंचायत आणि ब्लॉक पातळीवर साठवण सुविधा वाढवणे, सिंचन व्यवस्था सुधारणे हे आहे. ही योजना ११ मंत्रालयांच्या ३६ योजनांच्या समन्वयातून राबविली जाईल, ज्यामध्ये राज्य सरकारे आणि खाजगी क्षेत्राच्या भागीदारीच्या योजनांचाही समावेश असेल. कमी उत्पादकता, कमी पीक चक्र आणि कमी कर्ज वितरण अशा तीन प्रमुख निकषांच्या आधारे १०० जिल्ह्यांची निवड केली जाईल. प्रत्येक राज्यातील किमान एक जिल्हा समाविष्ट केला जाईल.

# अखिल भारतीय मानवाधिकार संघटन महाराष्ट्राच्या उपाध्यक्ष पदी मा. गायत्रीताई रामटेके यांची नियुक्ती

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------------

प्रत्येक मानसावर होणाऱ्या अन्याय आणि अत्याचारांना वाचा फोडण्याकरीता,मानव जातीला सुरक्षा प्रदान करण्याकरीता, प्रत्येक क्षेत्रातील सामाजिक सांस्कृतिक व आर्थिक कार्यात सहकार्य करण्या करिता अखिल भारतीय मानवाधिकार संघटन संस्था काम करते.अशा संघटनेच्या महाराष्ट्र उपाध्यक्षपदी मा. गायत्री ताई अनिल रामटेके रा. बल्लारपूर जी. चंद्रपूर यांची मा. शिवदास नारायण महाजन राष्ट्रीय अध्यक्ष, अखिल भारतीय मानवाधिकार संघटन.यांनी पुढील तीन वर्षा करिता नियुक्ती केलेली आहें.मा. गायत्री ताई



रामटेके यांनी आतापर्यंत माता रमाई, माता सावित्री बाई फुले, आणि माता जिजाऊ मॉ साहेब यांच्या जीवनावर आतापर्यंत 160 एकपात्री प्रयोग सादर केलेले आहेत. या व्यतिरिक्त इतर वेगवेगळया क्षेत्रात तसेच सामाजिक क्षेत्रात खूप मोलाचे कार्य करीत आहेत. आजपर्यंत त्यांना अनेक सामाजिक शैक्षणिक सांस्कृतीक क्षेत्रातील राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झालेलेआहेत. त्यांच्या सामाजिक विधायक कार्याची दखल घेऊन त्याची निवड करण्यात आलेली आहें.दि १५ जुलै २०२५ ला पुणे येथे नियुक्तपत्र देऊन सन्मानित करण्यात आले, या वेळी आ.शिवदास नारायण महाजन राष्ट्रीय अध्यक्ष, ॲड. रामकृष्ण सेहगल. महाराष्ट्र राज्य सल्लागार, ॲड विद्या बागडे राष्ट्रीय उपाध्यक्ष (युथ ) आ. नागनाथ लष्करे , राष्ट्रीय उपाध्यक्ष, मा. शिवनारायण कुशवाह सेक्रेटरी, मा. महेश चाकणकर राज्य उपाध्यक्ष (युथ) आदि मान्यवर उपस्थित होते.मा गायत्री ताई रामटेके यांची महाराष्ट्र उपाध्यक्ष पदी नियुक्ती झाल्या मुळे संपूर्ण चंद्रपूर जिल्ह्यामंध्ये,आणि त्याच्या सर्व मित्र मंडळी व चाहत्या वर्गानी आनंद व्यक्त केला आहें विशेष करून नाशिकमधून साहेबराव नंदन तात्या यांनी फोनद्वारे अभिनंदन करून, पुढील कार्यासाठी भरभरून शुभेच्छा दिल्या.

# देगलूर तहसील कार्यालयाच्या नवीन इमारतीच्या जागेवर शिक्कामोर्तब ...!

## खा. डॉ. अजित गोपछडे यांच्या प्रयत्नांना यश ; कृषी कार्यालयाच्या जागेवर डिजिटल वास्तू उभारणार

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

--------------------------



देगलूर तहसील कार्यालयाच्या नूतन इमारतीसाठी उभारण्यात येणाऱ्या जागेचा वाद आता संपुष्टात आला असून येथील तालुका कृषी कार्यालय तथा बीज गुणन केंद्राच्या जागेवरच नूतन इमारत उभारण्यावर शिक्कामोर्तब झाला आहे.

देगलूर तहसील कार्यालयाची डिजिटल वास्तू उभारण्यासाठी राज्यसभा खा. डॉ. अजितजी गोपछडे यांनी महाराष्ट्र सरकारकडे वारंवार पाठपुरावा केला . आणि बुधवार दि. १६ जुलै रोजी त्यांच्याच अध्यक्षतेखाली नांदेड येथील जिल्हाधिकारी कार्यालय भावनात जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये जिल्हा प्रशासन बैठकीत सहमतीने उपरोक्त निर्णय घेण्यात आला.

देगलूर तालुक्याच्या विकासाचा आगामी काळातील विचार करता विस्तीर्ण आणि मोठ्या जागेची आवश्यकता आहे . त्या अनुषंगाने देगलूर येथील कृषिअधिकारी कार्यालयची पाच एकर जागा महसुस विभागाकडे हस्तांतरण करुन त्या ठिकणी भव्य आणि प्रशस्त तहसील कार्यालय, अधिकारी, कर्मचारी निवास, पार्किंग, कैन्टीन यासह सर्व आवश्यक सुविधा या तहसील कार्यालयात निर्माण करावे असा निर्णय घेण्यात आला. आणि तसा प्रस्ताव महाराष्ट्र सरकार कडे जिल्हाप्रशासना मार्फत पाठविण्याचा निर्णय जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी घेतला असल्यामुळे देगलूर तहसील कार्यालयाची नूतन इमारत कृषी अधिकारी कार्यालयाच्या जागेवरच उभारणार यावर शिक्कामोर्तब झाल्याचे दिसून येते..

याप्रसंगी जि.प. मुख्यकार्याधिकारी मेघना कावली, निवासी उपजिल्हाधिकारी किरण आंबेकर, कार्यकारी अभियंता संदीप कोटलवार , उपजिल्हाधिकारी अनुप पाटील ,उप विभागीय अभियंता नीळकंठवार यांच्या सह देगलूर तालुक्यातील लोकप्रतिनिधींची उपस्थिती होती..

# सोनोपंत दांडेकर महाविद्यालयात करिअर संसद शपथविधी सोहळा उत्साहात संपन्न

विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------------

दिनांक १५ जुलै २०२५ रोजी महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग तसेच माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र (MITSC) यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या करिअर कट्टा उपक्रमांतर्गत २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी स्थापन करण्यात आलेल्या करिअर संसदेच्या शपथविधी सोहळ्याचे आयोजन सोनोपंत दांडेकर महाविद्यालयात मोठ्या उत्साहात व शिस्तबद्ध पद्धतीने संपन्न झाले.

जागतिक युवा कौशल्य दिनाचे औचित्य साधून सदर कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन विद्यार्थ्यांनी स्वयंरूपाने करत प्रशंसनीय कामगिरी बजावली. कार्यक्रमात करिअर कट्टा पालघर जिल्हा समन्वयक सहा. प्रा. तेजस चौधरी व महाविद्यालयीन समन्वयक सहा. प्रा. संतोष शिरसाट यांनी



विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

या यशस्वी उपक्रमाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किरण सावे यांनी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक करत सर्व पदाधिकारी, समन्वयक आणि MITSC करिअर कट्टा अध्यक्ष यशवंत शितोळे यांचे अभिनंदन केले.

करिअर संसदेचे शपथ घेतलेले विद्यार्थी पदाधिकारी पुढीलप्रमाणे :प्रवीण अमृते – मुख्यमंत्री, मनिष चौधरी – नियोजन मंत्री, जुही सिंग – कायदे व शिस्त पालन मंत्री, साची मोरब – सामान्य प्रशासन मंत्री, प्रग्नय मोरे – माहिती व प्रसारण मंत्री, अर्पिता पाटील – उद्योजकता विकास मंत्री, मगनसिंह राजपूत – रोजगार व स्वयंरोजगार मंत्री, आचल यादव – कौशल्य विकास मंत्री, निर्मला राजपूत – कामकाज मंत्री, रिया परब – महिला व बालकल्याण मंत्री, तृप्ती शेरे, शांभवी राऊत, संस्कृती तांडेल, स्वाती पासवान – सदस्य

# महाराष्ट्रातील १२ किल्ल्यांना युनेस्को जागतिक वारसा यादीत स्थान मिळाल्याने पिंपळनेर भाजप मंडळातर्फे जल्लोष

विनोद मोरे
साक्री शहर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------

पिंपळनेर , छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत स्थान मिळाल्याच्या ऐतिहासिक निर्णयाचे स्वागत करण्यासाठी भारतीय जनता पार्टी , पिंपळनेर मंडळातर्फे काल सायंकाळी छत्रपती शिवाजी चौक (पाटील गल्ली )येथे जोरदार जल्लोष करण्यात आला पालकमंत्री मंत्री मा.ना.जयकुमार भाऊ रावल आणि जिल्हा अध्यक्ष बापूसाहेब खलाणे यांच्या निर्देशानुसार आयोजित या कार्यक्रमात भाजपाचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला . सायंकाळी ५ वाजता छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले .



त्यानंतर फटाके फोडून आणि पेढे वाटून उपस्थितांनी आनंद व्यक्त केला . यावेळी छत्रपती शिवाजी महाराज की , अशा घोषणांनी परिसर दंणाणून सोडला होता . केंद्रातील मोदी सरकार आणि महाराष्ट्रातील फडणवीस सरकारने शिवरायांच्या या ऐतिहासिक किल्ल्यांना जागतिक स्तरावर नेण्यात महत्त्वाची भूमिका बजावल्याबद्दल त्यांचे आभार मानण्यात आले . युनेस्को च्या यादीतील १२ किल्ले आणि त्यांचे महत्त्व युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत ' अद्वितीय वैश्विक मूल्य ' म्हणून समाविष्ट झालेल्या या १२ किल्ल्यांमध्ये महाराष्ट्रातील ११ किल्ले _ रायगड , राजगड , प्रतापगड, पन्हाळा , शिवने-री , लोहगड, साल्हेर , सिंधुदुर्ग , विजयदुर्ग सुवर्णदुर्ग , खांदेरी , तसेच तामिळनाडूतील एक किल्ला _ जिंजी यांचा समावेश आहे . युनेस्को ही संस्थाजगभरातीलऐतिहासिक , नैसर्गिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वाच्या स्थळांना जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित करते . या किल्ल्यांना युनोस्कोचा हा दर्जा मिळाल्याने त्यांचे महत्त्व जगभरातील पर्यटकांपर्यंत पोहोचण्यास मदत होईल . यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचा गौरवशाली इतिहास संपूर्ण जगाला ज्ञात होईल आणि जगभरातून पर्यटक या किल्ल्यांना भेट देण्यासाठी आकर्षित होतील . याशिवाय, युनेस्को कडून या १२ किल्ल्यांच्या शास्त्रीय संवर्धनासाठी तांत्रिक आणि आर्थिक मदत मिळेल . जागतिक वारसा स्थळात समावेश झाल्यामुळे नवीन रोजगाराच्या संधी निर्माण होतील आणि पर्यटकांची संख्या वाढल्याने देशाच्या अर्थव्यवस्थेलाही मोठा फायदा होईल . या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन भारतीय जनता पार्टी पिंपळनेर मंडळ ,युवा मोर्चा, शहर पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी एकत्रितपणे केले होते . हा ऐतिहासिक निर्णय छत्रपती शिवरायांच्या जाज्वल्य इतिहासाला जागतिक पातळीवर घेऊन जाणारा असून , यामुळे महाराष्ट्राच्या पर्यटनाला ही मोठी चालना मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे .

# “माझी अध्यक्षपदासाठी कोणतीही दावेदारी नाही, पक्ष जे ठरवेल ते मला मान्य” – भेरसिंग नागपुरे अध्यक्षपदाची निवडणूक १९ जुलैला

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

---------------------

गोंदिया जिल्हा मध्यवर्ती बँकेची निवडणूक २९ जून रोजी पार पडली. या निवडणुकीसाठी भाजप-शिवसेना (शिंदे गट) व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांनी एकत्र येत सहकार पॅनल, तर काँग्रेस व इतर घटक पक्षांनी मिळून परिवर्तन पॅनल तयार केले होते. या निवडणुकीत दोन्ही पॅनलच्या



तिकिटावर अनेक मातब्बर नेते रिंगणात उतरले होते, त्यामुळे खासदार प्रफुल पटेल, नाना पटोले व आमदार परिणय फुके यांची प्रतिष्ठा पणाला लागली होती.

निकालानंतर सहकार पॅनलचे ११, परिवर्तन पॅनलचे ६ तर अपक्ष ३ असे एकूण २० संचालक निवडून आले. यामुळे बहुमत सहकार पॅनलकडे असून, अध्यक्षपदासाठी चुरस वाढली आहे.

निवडणुकीपूर्वी आमदार परिणय फुके यांनी राजेंद्र जैन यांचे अध्यक्षपदासाठी नाव जाहीर केले होते. मात्र, सध्या भाजपाकडून भेरसिंग नागपुरे यांच्या नावाची जोरदार चर्चा आहे. यावर प्रतिक्रिया देताना नागपुरे म्हणाले, " माझी अध्यक्षपदासाठी कोणतीही वैयक्तिक दावेदारी नाही. पक्ष जो निर्णय घेईल, तो मला मान्य असेल."

दरम्यान, आगामी १९ जुलै रोजी अध्यक्षपदाची निवडणूक पार पडणार असून, सहकार पॅनलमधून कोणाच्या गळ्यात अध्यक्षपदाची माळ पडते, हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

# तिरोडा तालुका नक्षलग्रस्त घोषित करण्याची जोरदार मागणी!

## जगदीश (बालु) बावनथड़े यांच्यामार्फत खासदार प्रफुल पटेल यांना कर्मचाऱ्यांचे निवेदन सादर

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------




तिरोडा तालुक्याला पुन्हा नक्षलग्रस्त तालुका म्हणून घोषित करण्याची मागणी आता अधिकृत स्वरूपात पुढे आली आहे. तालुक्यातील सर्व शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी एकत्र येत खासदार प्रफुलभाई पटेल यांच्या नावाने जिल्हा परिषद सदस्य आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष जगदीश (बालु) बावनथडे यांना निवेदन सादर केले.

सदर निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे की, तिरोडा तालुक्याला नक्षलग्रस्त यादीतून वगळण्यात आल्यामुळे अनेक शासकीय लाभ व योजनांपासून अधिकारी-कर्मचारी वंचित राहणार आहेत, जे पूर्णपणे अन्यायकारक आहे. यामुळे शासनाने घेतलेला निर्णय रद्द करावा आणि तिरोडा तालुक्यासह संपूर्ण गोंदिया जिल्हा पुन्हा नक्षलग्रस्त घोषित करावा, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.

या आंदोलनात्मक निवेदनाविषयी सर्व कर्मचाऱ्यांनी जगदीश बावनथड़े यांच्याशी सविस्तर चर्चा केली आणि त्यांच्यामार्फत खासदार प्रफुल पटेल यांना हा मुद्दा तातडीने पोहोचविण्याची मागणी केली. कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे की, "आमचे हक्काचे फायदे हिरावून घेणे, ही शासनाची अन्यायकारक कृती आहे."

यावर प्रतिक्रिया देताना जगदीश (बालु) बावनथड़े यांनी सांगितले की, > "मी लवकरच खासदार प्रफुलभाई पटेल यांच्याशी सविस्तर चर्चा करून हा निर्णय मागे घेण्यासाठी पाठपुरावा करीन. कर्मचाऱ्यांच्या हक्कासाठी मी लढा देणार."

या निवेदनामुळे तिरोडा तालुक्यातील प्रशासनात खळबळ उडाली असून हा विषय आगामी काळात जिल्हास्तरावर मोठा वळण घेण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# आझाद क्रांती सेनेचे धडक आंदोलन; दोषींवर तत्काळ कारवाईची मागणी

## बोगस शिक्षक भरती प्रकरणी जिल्हा परिषदेसमोर मोर्चा

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

--------------------------

जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात गेल्या काही वर्षांपासून सुरू असलेल्या बोगस शिक्षक भरतीच्या विरोधात आझाद क्रांती सेनेने गुरुवारी (दि. 17 जुलै) जिल्हा परिषद मुख्यालयावर जोरदार मोर्चा काढत दोषींवर तत्काळ कारवाई करण्याची मागणी केली.

या मोर्चाचे नेतृत्व सेनेचे संस्थापक अध्यक्ष नागेश दुबे यांनी केले. यावेळी त्यांनी सांगितले की, 2012 पासून जिल्ह्यात शिक्षक भरती प्रक्रियेत गंभीर अनियमितता झाली असून, त्यात तत्कालीन व सध्या कार्यरत शिक्षणाधिकारी तसेच अन्य संबंधित अधिकाऱ्यांचा सहभाग आहे.




त्यांनी स्पष्टपणे तत्कालीन शिक्षणाधिकारी हिवारे, डॉ. महेंद्र गजभिये, तसेच सध्याचे शिक्षणाधिकारी सुधीर महामुनी यांच्यावर आरोप केला. याशिवाय वरिष्ठ लिपिक इडपाते, दलाल धर्मदास हरीणखेडे, चंद्रभागा चंचलवेन, पटेल शाळेच्या मुख्याध्यापिका, व शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर उके यांचाही या प्रकरणात सहभाग असल्याचे नमूद करण्यात आले.

विशेष म्हणजे सुहास उके या कर्मचाऱ्याची कोणतीही पात्रता किंवा अनुभव नसताना त्यांची नेमणूक झाल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. या सर्व प्रकरणांची सखोल चौकशी करून संबंधित दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी यावेळी करण्यात आली.

मोर्चादरम्यान मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदनही पाठविण्यात आले. जिल्हा परिषदेने वेळेवर पावले न उचलल्यामुळेच आंदोलन करण्यात आले असल्याचे नागेश दुबे यांनी सांगितले.

या आंदोलनानंतर प्रशासन काय पावले उचलेल, आणि संबंधितांवर कारवाई होईल का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist-Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

# गोंदियातील स्वच्छता समस्यांवर आजाद क्रांती सेनेचा उग्र मोर्चा नगर परिषद कार्यालयावर

## नगर परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन सादर; प्रभाग ५, ९, १०, ११ व १२ मधील अस्वच्छतेवर कारवाईची मागणी

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

---------------------------



गोंदिया शहरातील प्रभाग क्रमांक ५, ९, १०, ११ व १२ मध्ये दिवसेंदिवस वाढत चाललेली अस्वच्छता, कचरा गोळा करणाऱ्या घंटागाड्यांचा अभाव, तसेच सफाई कर्मचाऱ्यांच्या मनमानी व हलगर्जीपणामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.
या पार्श्वभूमीवर आजाद क्रांती सेनेच्या वतीने दिनांक १८ जुलै २०२५ रोजी नगर परिषद कार्यालयावर उग्र मोर्चा काढण्यात आला. यावेळी संघटनेने नगर परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले.
या आंदोलनाबाबत माहिती देताना आजाद क्रांती सेनेचे संस्थापक अध्यक्ष नागेश दुबे यांनी सांगितले की, "दिनांक २ जुलै २०२५ रोजी शासकीय विश्रामगृहात झालेल्या पत्रकार परिषदेत प्रशासनाला १५ दिवसांची मुदत देण्यात आली होती. मात्र, स्वच्छता व्यवस्थेचा बोजवारा व कर्मचाऱ्यांचा हलगर्जीपणा तसाच सुरू राहिल्यामुळे आंदोलनाचे पाऊल उचलले गेले."
नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित गंभीर समस्यांकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप संघटनेने केला आहे. मुख्यतः बाजार परिसर, शाळांजवळ, रुग्णालय परिसर आणि सार्वजनिक रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे ढीग साचले आहेत. घंटागाड्या वेळेवर न फिरणे, कर्मचारी कामावर गैरहजर राहणे, अधिकारी वर्गाचे दुर्लक्ष अशा विविध समस्या सातत्याने वाढत चालल्या आहेत.
संघटनेने दोषी अधिकाऱ्यांवर आणि कर्मचाऱ्यांवर त्वरित कारवाई करण्याची मागणी निवेदनातून केली असून, जर दहा दिवसांच्या आत ठोस पावले उचलली नाहीत, तर आणखी तीव्र स्वरूपाचे जनआंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.
या आंदोलनामुळे नगर परिषदेच्या प्रशासनावर दबाव वाढला असून, शहरवासीयांचे लक्ष आता नगर परिषदेच्या पुढील पावलांकडे लागले आहे.

# विकसित महाराष्ट्र 2047 सर्वेक्षणासाठी सहभाग घेण्याचे आवाहन

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

-----------------------------

भारत सरकारच्या विकसित भारत-२०४७ या दूरदृष्टी कार्यक्रमाच्या अनुषंगाने महाराष्ट्र सरकारने विकसित महाराष्ट्र-२०४७ ही महत्त्वाकांक्षी योजना हाती घेतली आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व विविध खात्यांचे मंत्री यांच्या नेतृत्वाखाली सर्व जिल्ह्यांमध्ये जनतेचा सहभाग घेऊन व्यापक चर्चासत्रे आयोजित केली जाणार आहेत. जनतेच्या सूचना, गरजा व अपेक्षा लक्षात घेऊन सदर व्हिजन डॉक्यूमेंट Vision Document तयार केले जाणार आहे. या सर्वेक्षणात नांदेड जिल्हयातील सर्व नागरीकांनी https://wa.link/o९३s९m या लिंकवर आपले मत नोंदवावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांनी आवाहन केले आहे.
विकसित महाराष्ट्र-२०४७ करिता व्हिजन डॉक्यूमेंट Vision Document तयार करण्याच्या अनुषंगाने नियोजन विभागाच्या २ जून २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.
त्यामध्ये दिनांक ६ मे ते २ ऑक्टोबर २०२५ अशा १५० दिवसांच्या कार्यक्रमाची घोषणा करण्यात आलेली आहे. या संकल्पनेच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रासाठी Vision Document तयार केला जात आहे. ज्यामध्ये कृषी व सलग्न क्षेत्र, उद्योग व सेवा, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, प्रशासन व पर्यावरणीय इ. क्षेत्रांच्या क्षेत्रनिहाय अभ्यास समित्या गठीत करण्यात आलेल्या आहेत, अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

# सोनेसांगवी शाळेचे दुहेरी यश – नवोदय व शिष्यवृत्तीत विद्यार्थ्यांची चमकदार कामगिरी

फिरोज सिकलकर
शिरूर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------------------




सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात झालेल्या इयत्ता पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षा आणि जवाहर नवोदय विद्यालयाच्या प्रवेश परीक्षेमध्ये सोनेसांगवी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने उल्लेखनीय यश संपादन करत शैक्षणिक क्षेत्रात आपली ठसा उमटवला आहे.
या यशात सर्वाधिक लक्षवेधी बाब म्हणजे, शाळेच्या ७७ वर्षांच्या इतिहासात प्रथमच प्राजक्ता विनोद सदाफुले या विद्यार्थिनीची जवाहर नवोदय विद्यालयात निवड झाली आहे. त्याचबरोबर तिने शिष्यवृत्ती परीक्षेत २५६ गुण मिळवत जिल्हा गुणवत्ता यादीत आपले स्थान पटकावले आहे.
शिष्यवृत्ती परीक्षेत आदित्य उल्हास डांगे याने २४२ गुण मिळवत मेरिटच्या उंबरठ्यावर दमदार हजेरी लावली, तर सृष्टी संदीप बोऱ्हाडे हिला २३८ गुण, आणि ओम सुरेश दाते यास २३२ गुण प्राप्त झाले आहेत. याशिवाय २०० हून अधिक गुण मिळवणारे अजूनही पाच विद्यार्थी असून एकूणच या शाळेचा निकाल अत्यंत उत्साहवर्धक ठरला आहे.
या यशामागे इयत्ता पाचवीचे वर्गशिक्षक श्री. गुलाबराव दगडू तळोले यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले असून, त्यांच्या अथक परिश्रमाचे हे फळ आहे.
मुख्याध्यापक श्री. नामदेव गायकवाड सर यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक करत त्यांचे अभिनंदन केले. या गौरवप्रसंगी केंद्रप्रमुख श्री. किसन पर्वती शिंदे, विस्तार अधिकारी श्री. खोडदे साहेब, गटशिक्षणाधिकारी कळमकर साहेब, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. शरद काळे, उपाध्यक्ष श्री. विजय बोऱ्हाडे, गावच्या सरपंच सौ. रेखाताई मल्हारीशेठ काळे, तसेच शिवसेना तालुकाप्रमुख श्री. मल्हारीशेठ काळे यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.
सोनेसांगवी शाळेच्या या दुहेरी यशामुळे गावात आनंदाचे व अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# कॉ. माधवराव गायकवाड यांची वैचारिक एकनिष्ठता दीपस्तंभासारखी  भास्कर कदम

सोमनाथ घोगांणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------



कॉ. माधवराव गायकवाड यांचे व्यक्तिमत्व उतुंग होते, त्यांची वैचारिक एकनिष्ठता दीपस्तंभासारखी आहे. त्याचे कार्य हे समाजासाठी प्रेरणादायी आहे, असे विचार नांदगावचे माजी नगराध्यक्ष भास्कर कदम यांनी त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त आयोजित कार्यक्रमात व्यक्त केले. नांदगाव येथील छत्रपती पत संस्थेत कॉ. माधवराव गायकवाड यांच्या जन्मशताब्दी निमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शाखा व्यवस्थापक देविदास नंद कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. प्रारंभी बाबूजींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी भास्कर कदम यांनी भाषणात नमूद केले की, आज वैचारिक एकनिष्ठता दुर्मीळ होत चालली आहे. कॉ. गायकवाड हे अखेरच्या श्वासापर्यंत कम्युनिस्ट पक्षाच्या विचारधारेशी एकनिष्ठ राहिले. अनेकदा पराभव पत्करले; परंतु विचारधारेशी बेईमानी केली नाही. तळागाळातील माणसासाठी त्यांचा संघर्ष होता. आयुष्यभर त्यासाठीच लढा दिला. कॉ. बाबूजींचा प्रत्यक्ष सहवास लाभला हे आमचे भाग्य समजतो, असेही कदम यांनी आपल्या भाषणाच्या शेवटी सांगितले. आभार प्रदर्शन व सूत्रसंचालन राहूल अहिरे यांनी केले. याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते नेमीचंद अग्रवाल, सलीमभाई शेख, धनराज अग्रवाल, अरबाज शेख, नाना पगार, दीपाली रत्नपारखी, शालिनी पगारे, भरत कासलीवाल, अशोक जाधव, रवींद्र पवार, मजहर खान, फकीर मोहंमद मन्सूरी, गिरीश कलंत्री यांचेसह सभासद उपस्थित होते.

# जादूचे प्रयोग म्हणजे मनोरंजनातून शिक्षणाकडे जाण्याचा अप्रतिम मार्ग - नगरसेवक युवराज पठारे

पल्लवी शेलार
श्रीगोंदा तालुका प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------------




जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कण्हेर ओहळ येथे पालक संवाद मेळावाचे औचित्य साधत जादूचे प्रयोग या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उदघाटन पारनेर नगरपंचायतचे नगरसेवक श्री. युवराज पठारे व सौ. मनीषा युवराज पठारे यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. गणेश भिसे प्रामुख्याने उपस्थित होते.
यावेळी नगरसेवक श्री. युवराज पठारे यांनी "जादूचे प्रयोग या कार्यक्रमाच्या माध्यमातून मनोरंजनासोबत विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची गोडी निर्माण होईल" असा आशावाद व्यक्त केला. सौ. मनीषा युवराज पठारे यांनी शाळांसाठी विविध कलागुणांना वाव देणारे उपक्रम आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले.
जादूगार प्रकाश शिरोळे यांनी जादूचे प्रयोग दाखवत विद्यार्थ्यांचे मनोरंजन केले. विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. काही प्रयोग करून दाखवत जादू हा विज्ञान व हातचलाखी चा खेळ आहे हे सिद्ध करून दाखवले.
शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती शगुफा शेख यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नेहमीच विविध उपक्रम राबविण्याचा प्रयत्न भविष्यातही कायम राहील असा मानस व्यक्त केला. कार्यक्रमाचे संयोजक, चित्रपट गीतकार श्री. अरुण वाळुंज यांनी जादूचे प्रयोग हा कार्यक्रम तालुक्यातील खेड्यापाड्यातील सर्वच शाळांमध्ये आयोजित केला जाईल असा विश्वास व्यक्त केला.
कार्यक्रम प्रसंगी सहशिक्षिका श्रीमती सुवर्णा खेडेकर, अंगणवाडी सेविका सौ.सुनंदा मगर, मदतनीस सौ. वैशाली सोबले व पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते

# एचएसआरपी नंबर प्लेट १५ ऑगस्टपर्यंत बसवून घ्यावी प्रादेशिक परिवहन विभागाचे आवाहन

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

----------------------

ज्या वाहनांची ०१ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेली आहे. त्या वाहनांना हाय सिक्युरीटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट नाही. अशा वाहनधारकांनी अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने शुल्क भरुन १५ ऑगस्ट २०२५ पूर्वी एचएसआरपी नंबर प्लेट बसवून घ्यावी, असे आवाहन सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी आशिष दरगोडे यांनी केले आहे.
केंद्रीय मोटार वाहन नियम,१९८९ च्या नियम ५० नुसार वाहनांस एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्याची तरतूद आहे. तसेच रस्ते व महामार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या G.S.R. ११६२ (E) ०४ डिसेंबर २०१८ व S.O. ६०५२(E) दि.०६.१२.२०१८ नुसार १ एप्रिल २०१९ पासून उत्पादित होणाऱ्या सर्व नवीन वाहनांना हाय सिक्युरीटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट बसविण्याची तरतूद करण्यात आली आहे. एचएसआरपी नंबर प्लेट विहित वेळेत न बसविल्यास मोटार वाहन कायद्यानुसार परिवहन विभागातर्फे दंड आकारणी करण्यात येणार आहे. वाहनधारकांनी दंड टाळण्यासाठी १५ ऑगस्ट २०२५ पूर्वी एचएसआरपी नंबर प्लेट बसवून घ्यावी.
वाहनांच्या नंबर प्लेटमध्ये छेडछाड व बनावटगिरी करुन होणारे गुन्हे कमी करणे, रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांची ओळख पटविणे व तसेच राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सर्व वाहनांना मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी व नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून ०१.०४.२०१९ पूर्वी उत्पादीत वाहनांना एचएसआरपी बसविण्याकरिता मे. रोजमर्टा सेफ्टी सिस्टम लिमीटेड या संस्थेची/उत्पादकाची निवड करण्यात आली आहे. वाहनधाकारंनी वाहनांना हाय सिक्युरीटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट बसविण्यासाठी ऑनलाईन अपॉईंटमेंटसाठी https://mhhsrp.com या संकेतस्थळावर भेट द्यावी. या व्यतिरीक्त कुठल्याही इतर संकेतस्थळावर नोंदणी करणे टाळावे. मोटार सायकल व ट्रॅक्टरसाठी दर ४५० रुपये तीन चाकी वाहनांसाठी ५०० रुपये व सर्व प्रकारचे चारचाकी वाहनांसाठी ७४५रुपये इतका दर आकारला जाणार आहे. या व्यतिरीक्त जीएसटीचा दर भरावा लागणार आहे व हे शुल्क हे ऑनलाईन स्वरुपातच भरावे लागणार आहे.
सद्यस्थितीत नांदेड जिल्ह्यामध्ये १७ जुलै २०२५ रोजीपर्यत ५० हजार २७३ वाहनांची नोंदणी ऑनलाईन पध्दतीने एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्यासाठी करण्यात आली आहे. एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्यासाठी चांगला प्रतिसाद मिळत असून वाहनांना एचएसआरपी बसविण्याची अंतिम १५ ऑगस्ट २०२५ पर्यत मुदतवाढ देण्यात आली आहे.
०१.०४.२०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या जुन्या वाहनांना हाय सिक्युरीटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट बसविण्याबाबत शासनाद्वारे नियुक्त करण्यात आलेले अधिकृत एचएसआरपी फिटमेंट सेंटरर्स येथे एचएसआरपी बसविण्याकरिता ॲपाईटमेंट घेण्याची कार्यपध्दती व इतर सर्वप्रकारची माहिती विभागाच्या https://www.transport.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे असे प्रादेशिक परिवहन विभागाने प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.




# जिल्हा परिषद डांगशिरवाडे शाळेची विद्यार्थीनी कु. रिना सोनवणे हिचे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या शिष्यवृत्ती परीक्षेत विशेष प्राविण्य

किशोर सोनवणे
दैनिक स्वराज्यदूत

---------------------------




अल्पावधीतच जिल्हा परिषद केंद्रशाळा डांगशिरवाडे ता.साक्री जि.धुळे येथील शाळेला वेगवेगळ्या ठिकाणाहून अल्पावधीच मोठे यश प्राप्त झालेले असून शाळेने केलेल्या वेगवेगळ्या उपक्रमातून आपली शाळा ही कशी वेगळी आहे हे विविध उपक्रमातून दाखवून दिले, नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद अंतर्गत शासकीय शिष्यवृत्ती परीक्षेत इ. पाचवी शाळेची विद्यार्थिनी कु. रिना विनायक सोनवणे ही जिल्हास्तरीय यादीत प्रथम दहामध्ये चतुर्थ क्रमांकावर तर तालुकास्तरीय दुसरा क्रमांक पटकावला असून तिने ८४.६६% येवढे गुण मिळवले असून अगदी प्रतिकूल परिस्थितीत आदिवासी भागातील अती दुर्गम भागात असलेल्या या शाळेत अनेक शासकीय सुविधांचा अभाव असून, पालकांची आर्थिक परिस्थिती नसताना फक्त शाळेतील शिक्षकांचे मार्गदर्शनाच्या जोरावर तिने हे यश संपादन केले, याबद्दल शाळेचा जिल्हास्तरावर शिष्यवृत्ती परीक्षेत लौकिक वाढवल्याबद्दल शाळेची विद्यार्थिनी कु. रिना विनायक सोनवणे या विद्यार्थिनीचे ग्रामस्थ व पालकांनी मन भरून कौतुक केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# जवानाच्या रस्त्याच्या मागणीला प्रशासनाचे दुर्लक्ष – उपोषणाने घेतले गंभीर वळण

## रस्ता न मिळाल्याने जवानाचं बेमुदत उपोषण; प्रकृती चिंताजनक अवस्थेत उपोषणाचा पाचवा दिवस; डॉक्टरांचा तातडीने हस्तक्षेप

### २०११ पासून सुरू असलेल्या संघर्षाला अद्याप तोडगा नाही जवानाचा स्पष्ट इशारा – "मुख्यमंत्री येईपर्यंत उपोषण मागे घेणार नाही"

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

-------------------------



कुऱ्हाडी येथील रहिवासी व सशस्त्र सीमा बलात (SSB) कार्यरत असलेले जवान निरंजन श्रावण येरणे यांनी आपल्या पुश्तैनी घरापर्यंत रस्ता उपलब्ध करून द्यावा या मागणीसाठी १४ जुलैपासून बेमुदत उपोषण सुरू केले आहे. आज या उपोषणाचा पाचवा दिवस असून, त्यांची प्रकृती चिंताजनक झाली आहे. डॉक्टरांची टीम उपोषणस्थळी दाखल होऊन पेंडालमध्येच उपचार सुरू करण्यात आले आहेत.

जवान येरणे यांनी २०११ पासून ग्रामपंचायत, पोलीस ठाणे, तहसील कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आदी ठिकाणी तक्रारी करूनही १५० फूट लांब व १० फूट रुंद रस्ता अतिक्रमणामुळे बंद असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या म्हणण्यानुसार, या प्रकरणात न्यायालयाचे आदेश , आणि जिल्हाधिकारी निर्देश असूनही ग्रामपंचायत कुऱ्हाडी व स्थानिक प्रशासन यांनी योग्य ती कारवाई टाळली.

२०२३ मध्ये त्यांच्या पत्नीचे निधन झाल्यानंतरही ते स्वतःच्या घरापर्यंत पोहोचू शकले नाहीत, ही बाब प्रशासनाच्या असंवेदनशीलतेचे जिवंत उदाहरण ठरते.

जवान येरणे यांनी २८ जून रोजी दिलेला इशारा प्रशासनाने गांभीर्याने घेतला नाही. त्यावेळी त्यांनी आत्मदहनाचा इशारा दिला होता, परंतु पंचांसमोर झालेल्या समझोत्यामुळे तो निर्णय मागे घेतला होता. मात्र, आता त्यांनी बेमुदत उपोषणाचा निर्धार केला आहे.

निरंजन येरणे यांचा ठाम निर्धार:

"मुख्यमंत्री येईपर्यंत उपोषण मागे घेणार नाही, जीव गेला तरी चालेल पण आता मागे हटणार नाही."

त्यांच्या प्रकृतीच्या पार्श्वभूमीवर पोलीस आणि आरोग्य विभागाचे पथक तैनात करण्यात आले आहे. मात्र, सततची उपेक्षा आणि वाढते आरोग्यधोके पाहता हे आंदोलन आता निर्णायक टप्प्यावर पोहोचले आहे.

प्रश्न प्रशासनासमोर:

१५ वर्षांच्या न्यायासाठीच्या लढ्याला आता तोडगा मिळणार का?

प्रशासन जागं होणार की अजून एक जवान उपेक्षेचा बळी ठरणार?

# निर्वि गावात महिलांसाठी पहिल्यांदाच टेलरिंग व आरी वर्कचे मोफत प्रशिक्षण; स्वराज्य रक्षक फाउंडेशनचा उपक्रम स्तुत्य

फिरोज सिकलकर
शिरूर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------




शिरूर तालुक्यातील निर्वि येथे गेल्या पंधरा वर्षांत प्रथमच महिलांसाठी मोफत आरी वर्क व टेलरिंग प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमामध्ये ६० महिलांनी सहभाग घेत आत्मनिर्भरतेच्या दिशेने मोठे पाऊल टाकले आहे.

या प्रशिक्षणाचे आयोजन स्वराज्य रक्षक फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले असून, संस्थेचे अध्यक्ष व पदाधिकारी गेली अनेक वर्ष महिलांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहेत. घरगुती जबाबदाऱ्या सांभाळत महिलांना उत्पन्नाचे स्रोत उपलब्ध व्हावेत, यासाठी आरी वर्क, टेलरिंग, पार्लर यांसारख्या कौशल्यावर आधारित प्रशिक्षण देण्यात येत आहे.

प्रशिक्षण वर्गाचे आयोजन निर्वि ग्रामपंचायत व विद्यमान आदर्श सरपंच सौ. मनीषा शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यामध्ये ३० महिलांना आरी वर्क व ३० महिलांना टेलरिंग प्रशिक्षण देण्यात आले. विशेष म्हणजे या सर्व महिलांना आवश्यक साहित्यही पूर्णपणे मोफत देण्यात आले.

प्रशिक्षण कालावधीत महिलांनी घरकाम, शेतीसारख्या जबाबदाऱ्या सांभाळत जिद्दीने हे प्रशिक्षण पूर्ण केले. सर्टिफिकेट वितरण समारंभात बोलताना सरपंच मनीषा पवार यांनी, "या महिलांमध्ये केवळ निर्वि गावातीलच नव्हे, तर आजूबाजूच्या वाड्या-वस्त्यांमधून येणाऱ्या महिलांचाही समावेश असून त्यांनी चालत येत प्रशिक्षण पूर्ण करत मोठा आदर्श उभा केला आहे," असे सांगून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमात सोनल जगताप व जयश्री सोनवणे या प्रशिक्षणार्थी महिलांनी आपल्या भावना व्यक्त करत सरपंच मनीषा पवार व ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांचे आभार मानले. "हे प्रशिक्षण आम्हाला आर्थिकदृष्ट्या हातभार लावणारे ठरेल," अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

समारंभास मा.आदर्श सरपंच तात्यासाहेब सोनवणे, शरद पवार, ग्रामपंचायत सदस्य भाग्यश्री बुराडे, प्रमोद राजगुरव, अंजली साळुंके, पत्रकार शकील मनियार, प्रशिक्षणदाते जोती पाटील मॅडम (टेलरिंग) व दिव्या काळे मॅडम (आरी वर्क) आणि स्वराज्य रक्षक फाउंडेशनचे अध्यक्ष व पदाधिकारी उपस्थित होते.

गावातील महिलांना स्वयंपूर्णतेकडे घेऊन जाणाऱ्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून, भविष्यात अशा आणखी उपक्रमांची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# निफाड होरायझनच्या विद्यार्थ्याची पंढरपूर सायकलवारी

## निफाड ते पंढरपूर हे ३५० किमी अंतर दोन दिवसांत पूर्ण

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------------



निफाड सायकलिंग असोसिएशनने आयोजित केलेल्या पंढरपूर सायकल वारीमध्ये निफाड येथील होरायझन अकॅडमीतील इयत्ता नववीच्या अथर्व नकाते या विद्यार्थ्याने निफाड ते पंढरपूर हे जवळपास ३५० किमी अंतर अवघ्या दोन दिवसांत पूर्ण करत एक अनोखा विक्रम केला आहे.पर्यावरणपूरक जीवनशैलीला प्रोत्साहन देण्यासाठी या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या वारीमध्ये लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्व वयोगटांतील नागरिकांनी सहभाग घेतला, ज्यामुळे निफाड शहरात एक सकारात्मक वातावरण निर्माण झाले. वारीमध्ये सहभागी नागरिकांनी सायकल चालवण्याचे फायदे आणि पर्यावरणावर होणारे सकारात्मक परिणाम याबद्दल आपले अनुभव सांगितले. अनेक नागरिकांनी नमूद केले की, सायकल चालवणे आरोग्यासाठी चांगले आहे आणि शहरांमध्ये सायकलचा वापर वाढल्यास वाहतूक कोंडी व प्रदूषण कमी होण्यास मदत होईल. एका सहभागी नागरिकाने सांगितले की, "शहरात सायकल चालवण्यासाठी चांगले रस्ते आणि सुरक्षित वातावरण निर्माण झाल्यास, अधिक लोक सायकल चालवण्यासाठी प्रोत्साहित होतील. " या सायकलवारीच्या आयोजकांनी सांगितले की, " येत्या काळात शहरात सायकल चालवण्यास प्रोत्साहन देण्यासाठी आणखी उपक्रम राबवण्यात येतील." या सायकलवारीमुळे शहरात सायकलिंगबद्दल जागरूकता वाढली असून, नागरिकांमध्ये पर्यावरण आणि आरोग्याबद्दल सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाला आहे.अथर्व नकाते या विद्यार्थ्याच्या या साहसी वृत्तीचे मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस नितीन ठाकरे, सभापती बाळासाहेब क्षीरसागर व इतर पदाधिकारी, शिक्षणाधिकारी डॉ. के. एस. शिंदे, मुख्याध्यापिका स्नेहल सोनवणे आदींनी कौतुक केले आहे.

# माणगांव तालुका प्रेस क्लब पुरस्कृत आदर्श प्रगतशील शेतकरी पुरस्कार प्रदान सन्मान सोहळा उत्साहात संपन्न

सुनील बाचरे
रायगड प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------





गुरुवार दिनांक १७ जुलै २०२५ रोजी माणगांव तालुका प्रेस क्लब आयोजित आदर्श शेतकरी पुरस्कार २०२५ सन्मान सोहळा माणगांव तालुका प्रेस क्लब चे पदाधिकारी, शेतकरी, विविध क्षेत्रातील मान्यवर आणि कृषी विभाग, पोलीस प्रशासन, महसूल प्रशासन, वनविभाग इत्यादी खात्याचे प्रशासकीय अधिकारी व स्थानिक नागरिक यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

जागतिक स्तरावर भारत हा कृषी प्रधान देश आहे. कृषी उत्पन्न, कृषी पुरक व्यवसाय हा देशाच्या अर्थ व्यवस्थेचा कणा आहे असे मानले जाते. बळीराजा अर्थात शेतकरी हा सार्या जगाचा पोशिंदा आहे असे म्हटले जाते. कारण उन, वारा आणि पाऊस याची पर्वा न करता निसर्गाचा लहरीपणा अवर्षण, प्रवर्षण, दुष्काळ इत्यादी नैसर्गिक स्थितीतअत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शेतकरी आपल्या शेतात अहोरात्र प्रचंड मेहनत करून आपले रक्त आटवून शेतातून विविध प्रकारचे अन्न धान्ये, तृणधान्य, भाजीपाला, फुलशेती, फळपिके, गायी म्हशी पालनाच्या माध्यमातून दुग्धोत्पादन, मत्स्य व्यवसाय, कुक्कुटपालन, शेळी पालन, वराह पालन, मधुमक्षिका पालन आणि औषधी वनस्पती इत्यादी शेतमालाची निर्मिती करून आपल्या सर्वांचे निरंतर पोषण करत असतो म्हणून तो समस्त जगाचा पोशिंदा आहे. अशा या जगज्जेत्या बळीराजाच्या अर्थात शेतकरी राजाच्या अपार कष्टाची दखल घेत त्याच्या या परोपकारी कार्याचा कुठेतरी सन्मान, गौरव व्हायलाच पाहिजे या शुद्ध प्रामाणिक भावनेतून माणगांव तालुका प्रेस क्लब ने आपले सामाजिक उत्तरदायित्व समजून आदर्श शेतकरी पुरस्कार सन्मान सोहळ्याचा संकल्प केला. या संकल्पने नुसार प्रतिवर्षी तालुक्यातील किमान दोन प्रगतशील शेतकर्यांची निवड करून त्यांना माणगांव तालुका प्रेस च्या वतीने त्यांच्या शेताच्या बांधावर जाऊन त्यांना शाल, पुष्पगुच्छ, स्मृतीचिन्ह आणि सन्मानपत्र देऊन त्यांना जाहीर कार्यक्रमात गौरवण्यात येते.

या वर्षी माणगांव तालुका प्रेस क्लब च्या माध्यमातून माणगांव तालुक्याच्या इंदापूर विभागातील माकटी या गावचे प्रगतशील शेतकरी गणपत गोविंद मुरकर हे गेली सहा दशके आपल्या शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विविध प्रकारच्या पिकांच्या माध्यमातून भरघोस उत्पन्न घेऊन आपला कौटुंबिक चरितार्था बरोबर देशाच्या अर्थ व्यवस्थेला मजबूत करण्यासाठी हातभार लावतात. तसेच माणगांव तालुक्याच्या निजामपूर विभागातील चाच गावचे प्रगतशील शेतकरी सहदेव सदू नाकते आणि सुजाता सहदेव नाकते या उभय दाम्पत्य प्रगतशील शेतकर्यांची निवड या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. हे उभय दाम्पत्य प्रगतशील शेतकरी आपल्या पारंपरिक शेतीला आधुनिक तंत्रज्ञान व पूरक व्यवसायाची जोड देऊन आपल्या शेतात यशस्वी रीत्या खेकडा पालन करतात त्यांच्या या व्यवसायातून त्यांचा कौटुंबिक चरितार्थासह देशाच्या अर्थ व्यवस्थेला मजबूत करण्यासाठी हातभार लावतात. या दोन्ही सन्मानित प्रगतशील शेतकर्यांचा आदर्श आजच्या नवीन पिढीने घेण्या सारखा आहे. म्हणून त्यांचा सन्मान करताना माणगांव तालुका प्रेस क्लब ला अभिमान वाटतो.

सदर कार्यक्रमास माणगांव तालुका प्रेस क्लबचे अध्यक्ष पत्रकार संतोष सुतार, उपाध्यक्ष विश्वास गायकवाड, उपाध्यक्षा आरती म्हामुनकर, मुख्य संघटक पद्माकर उभारे,कार्याध्यक्ष गौतम जाधव, सल्लागार उत्तम तांबे, सल्लागार विनोद सापळे, खजिनदार सचिन वनारसे, तालुका कृषी अधिकारी किरण पडवळकर, कृषी सहाय्यक बांगर, सहायक पोलीस निरीक्षक नरेंद्र बेलदार, पोकॉ. दहिफळे, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे महाराष्ट्र युवा सचिव, भुवन ग्रामपंचायतीचे सरपंच दिपक जाधव, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या महिला कार्यकर्त्या श्रद्धा यादव, इंदापूर माजी उपसरपंच उदय अधिकारी, उपविभागीय अधिकारी तथा प्रांताधिकारी डॉ. संदिपान सानप, तहसीलदार दशरथ काळे, वनपरिक्षेत्र अधिकारी प्रशांत शिंदे, तलाठी साळवे, लक्ष्मण गोरेगावकर, गणपत डवले, दोन्ही ठिकाणचे शेतकरी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भावपुर्ण श्रद्धांजली

वाटले नव्हते कोणालाही असे अघटीत घडून जाईल
चालता बोलता देव तुम्हास नेईन
माणुसकी, स्नेह याची ज्यावेळी चर्चा होईल त्यावेळी
सर्वात पहिली आठवण तुमची येईल...!



(मृत्यु दिनांक - १२-०७-२०२५)

कै.अनिल शंकर घनदाट

❊ दशक्रिया विधी कार्यक्रम ❊
सोमवार दि.२१/०७/२०२५ रोजी सकाळी ८:०० वा.
शिवांजली हॉल,साईबाबा मंदिराशेजारी गंगाघाट,
पंचवटी नाशिक . ४२२००३

शोकाकुल
श्री. शंकर रुंजाजी घनदाट (वडील)
श्रीमती. शुभांगी अनिल घनदाट (पत्नी)
सौ. मीरा शंकर घनदाट (आई)
कु. ओम अनिल घनदाट (मुलगा)
कु. कार्तिक अनिल घनदाट (मुलगा)

समस्त घनदाट परिवार

शतायुषी हो बाळा..

दैनिक स्वराज्यदूत सादर करीत आहे एक नवीन सदर....

आपल्या चिमुरड्याच्या वाढदिवसाला आम्ही देऊ प्रसिद्धी
फक्त आणि फक्त १५०/ रुपयात... तर मग पाठवा आपल्या
चिमुरड्याचा फोटो आणि शुभेच्छुक यांचे नाव आमच्या नंबरवर
आणि साजरा करा आपल्या चिमुरड्याचा वाढदिवस
दैनिक स्वराज्यदुतच्या लाखो वाचकांसह

आपल्या चिमुकल्याचे वाढदिवसाचे फोटो पाठविण्यासाठी मोबा. नंबर ८४४६६७३६७७

# महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक स्वराज्यदूत वृत्तपत्रातर्फे राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन !

## स्वराज्यदूत गौरव पुरस्कार

कर्तृत्वाचा सन्मान... स्वराज्याचा मान !!




महाराष्ट्रातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषी, सहकार, उद्योग, वैद्यकीय, पत्रकारिता (वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक / डिजीटल मीडिया), युवक, महिला, कला, साहित्य, क्रीडा, पर्यावरण, ग्रामविकास अशा विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनिय कार्य करणाऱ्या संस्था व मान्यवर व्यक्तींच्या कार्याचा विशेष सन्मान करून भावी वाटचालीस तसेच उल्लेखनिय कार्य करण्यासाठी प्रेरणा मिळावी म्हणून दैनिक स्वराज्यदूतने हा पुरस्कार आयोजित केलेला आहे.

कौतुक तुमच्या कार्याचे

दैनिक स्वराज्यदूत SWARAJYADOOT
www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!
SWARAJYADOOT LIVE

दैनिक वृत्तपत्र
वृत्त वाहिनी

ऑगस्ट महिन्यात नाशिक येथे अतिशय भव्य-दिव्य समारंभात पुरस्कार वितरण नियोजित

### प्रस्ताव पाठविण्यासंदर्भात सूचना

- संपूर्ण प्रस्ताव pdf स्वरुपात संगणकावर तयार केलेल्या स्वरुपात दि. ३१ जुलै २०२५ पर्यंत फक्त Google Form द्वारेच पाठवायचा आहे. गुगल फॉर्म लिंक 8446673677 या व्हॉटसअप वर उपलब्ध केली आहे. उपलब्ध झाली नसेल तर तशी मागणी करू शकतात.
- फक्त निवड झालेल्या व्यक्तींना प्रस्तावाची प्रिंट स्वरुपात (Hard copy) जमा करावी लागेल.
- प्रस्ताव पूर्णपणे मोफत स्वीकारले जातील. कोणताही आर्थिक मोबदला देण्याचा प्रयत्न करू नये. पुरस्कारासाठी कुणाशीही आर्थिक व्यवहार करू नये.
- दैनिक स्वराज्यदूत परिवाराशी संबंधित व्यक्ती, प्रतिनिधी यांना प्रस्ताव पाठवता येणार नाहीत.
- जिल्हा परिषद कर्मचारी, राज्य व केंद्र सरकारचे कर्मचारी यांचे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाही.

अधिक माहितीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.

**8446673677 / 8010232449**